## <u>जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव</u>

वाळू लिलाव सन 2017-2018 करीता जळगांव जिल्हयातील रेती/वाळू घाटांची

**जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या मंजूरीतील अटी व शर्तीनुसार**

ई-टेंडर आणि ई-ऑक्शन पध्दतीद्वारे निर्गती करीता फेर ई-निविदा सूचना

<u>फेर ई-निविदा सूचना</u>

क्र.गौख/ई-कावि/2017/8/26/११२१ दिनांक ०४/12/2017

सन 2017-18 मध्ये जळगांव जिल्हयातील 28 रेती/वाळू घाटांकरीता दिनांक 30 सप्टेंबर 2018 पर्यंतच्या मुदतीसाठी फेर ई-निविदा आणि ई-ऑक्शनद्वारे लिलाव प्रक्रिये बाबतची सविस्तर माहिती **<u>https://jalgaonco.abcprocure.com</u>** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच **वाळू लिलावाच्या अटी व शर्ती व वाळू लिलावची प्रक्रिया बाबतची माहिती** **<u>www.jalgaon.nic.in</u>** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत.

### 28 वाळु स्थळांची फेर ई-निविदा आणि ई-ऑक्शन प्रक्रीयेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| **कालावधी** | | **तपशिल** | |
|---|---|---|---|
| दिनांक 11 /12/2017 सकाळी 11 :00 पासून ते<br>दिनांक 27 /12/2017 सायं 6 : 00 पर्यंत | | ऑनलाईन रजिष्ट्रेशन | |
| दिनांक 11 /12/2017 सकाळी 11 :00 पासून ते<br>दिनांक 28 /12/2017 रात्री 6 : 00 पर्यंत | | ऑनलाईन ई-निविदा सादर करणे | |
| **ई-ऑक्शन (ई-लिलाव) दिनांकास करण्यांत येईल.** | दिनांक 29 /12/2017 सकाळी 11:00 वाजेपासून सायं 5:00 वाजेपावेतो | **लॉट क्रमांक**<br>गट (लॉट) क्रमांक 1<br>गट (लॉट) क्रमांक 2 | **वेळ**<br>स.11.00 ते 02.00<br>दु. 02.00 ते 5.00 |
| **ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ** | दिनांक 30/12/2017 सकाळी 11:00 वाजे पासून ते काम पूर्ण होईपावेतो | गट (लॉट) क्रमांक 1<br>गट (लॉट) क्रमांक 2 | ई-निविदा उघडणे (तांत्रिक लिफाफा व वाणिज्य लिफाफा) स.11.00 वाजे पासून ते काम पूर्ण होई पावेतो. |

ठिकाण :- जळगांव
दिनांक ०४ /12/2017

**अपर जिल्हाधिकारी जळगांव**

# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव
## रेती लिलाव कार्यक्रम 2017-2018
## रेती/ वाळू घाट लिलावा करीता ई-टेंडरींग आणि ई-ऑक्शन सूचना.

जळगांव जिल्हयातील प्रस्तावित असलेल्या 28 वाळू घाटांची **जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या मंजूरीतील अटी व शर्तीनुसार** सन 2017-2018 या वर्षाकरीता दिनांक 30 सप्टेंबर 2018 पर्यंत अथवा फेर ई-निविदेमध्ये दर्शविलेला वाळूसाठा संपे पावेतो यापैकी आधी संपणा-या मुदतीसाठी **फेर ई-निविदा आणि ई-ऑक्शन** प्रक्रीयेद्वारे लिलाव प्रक्रिये बाबतची सविस्तर माहिती **https://jalgaonco.abcprocure.com** व **www.jalgaon.nic.in** या संकेत स्थळावर **ई-ऑक्शन व** फेर ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यांत आल्या आहेत.

सर्व नागरीकांना किंवा इच्छूक कंत्राटदारांना ई-निविदा भरण्यासाठी आणि ई ऑक्शन मध्ये सहभागी होण्यासाठी जाहीर आवाहन करण्यात येत आहे. ई-निविदा आणि ई-ऑक्शन प्रक्रियेसाठी जळगांव जिल्हयाकरीता आयसीआयसीआय बँक व एबीसी प्रोक्युअर या संस्थेची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. **सदर संस्थेचा पत्ता आयसीआयसीआय बँक शाहू महाराज हॉस्पीटल समोर, जळगांव असून इच्छूक निविदा धारकांनी रजिस्ट्रेशन प्रक्रिया, डिझीअल सिगनेचर, प्रथम स्तर मान्यता कामी** (Registration process, Digital Signature Certificate and for First level approval,) **एबीसी प्रोक्युअर कंपनीचे प्रतिनिधींचे दूरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे आहे.**

| Sl. No. | Person Name | Contact No. | Mobile No. | Email ID |
|---|---|---|---|---|
| 1 | Paresh Deshmukh | 7940016811 | | paresh@abcprocure.com |
| 2 | Pooja Kodwani | 7940016840 | | pooja@abcprocure.com |
| 3 | Rizwan Ajmeri | 7940016843 | | rizwan@abcprocure.com |
| 4 | Himalay Vaishnav | 7940016848 / 07940016866 | 9099090830 | himalay@abcprocure.com / info@abcprocure.com |

**तसेच लिलाव सुरु असतांना तांत्रिक** (For any technical support while bidding in e-Tender & e-Auction, please call on below nos.) **मदतीसाठी एबीसी प्रोक्युअर कंपनीचे प्रतिनिधींचे दूरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे आहे.** For

| Escalation Matrix | | | | |
|---|---|---|---|---|
| Name | contact no. | cell no. | email id | common email id for all |
| Rahul Dixit | 079 40270555 | | rahul.dixit@eptl.in | support@abcprocure.com |
| Prashant Rajyaguru | 079 40270569 | | prashant@eptl.in | |
| Pankesh Kumar | 079 40270507 | 93745 19729 | pankesh@eptl.in | |
| Dharam Rathod | 079 40270596 / 079 40270566 | 9374519754 | dharam@eptl.in | |
| For e-Payment Related support, Mail to payment@eptl.in and contact to above given no. | | | | |

तसेच अधिक माहितीसाठी बॅंकेचे प्रतिनीधी श्री एकलव्य दे भ्रमणध्वनी क्रमांक +919168681171 तसेच श्री राहूल पाटील यांचा भ्रमणध्वनी क्रमांक +919004664486 वर संपर्क साधावा.

**आवश्यक कागदपत्रे :-** ई-निविदा आणि ई-ऑक्शन प्रक्रीयेत भाग घेणा-या निविदाधारकांनी ऑनलॉईन नोंदणी (Registration) करणे अनिवार्य राहील. ऑनलाईन नोंदणीसाठी (Registration) पुढील माहिती व कागदपत्राच्या साक्षांकित प्रती इच्छुक निविदा धारकास ऑनलॉईन सादर करणे बंधनकारक आहे. 1) ई-मेल आयडी 2) आधार कार्ड 3) पॅनकार्ड 4) नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा (मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्रे 5) GST क्रमांक 6) कंपनी किंवा फर्म असल्यास रजिष्ट्रेशनची प्रत 7) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे रक्कम रुपये 100/- मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र 8) विक्रीकर विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र 9) अधिकृत संस्थेकडील Digital Signature Certificate (DSC).

अटी व शर्तीनुसार ई-निविदा भरू इच्छिणा-या व्यक्तींना ई-निविदेसोबत पुढील प्रमाणे नापरतावा फी अदा कराव्या लागतील.

1) नोंदणी फी (फक्त एकदाच) – रूपये 2500/- मात्र (अधिक सर्व्हीस टॅक्स )ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबतच्या माहितीसाठी एबीसी कंपनीच्या प्रतिनिधी यांचे भ्रमणध्वनी क्रं. 7940016811, 7940016840, 7940016848, 07940016866 वर संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी बॅंकेचे प्रतिनीधी श्री एकलव्य दे भ्रमणध्वनी क्रमांक +919168681171 तसेच श्री राहूल पाटील यांचा भ्रमणध्वनी क्रमांक +919004664486 व 0253- 6693457 वर संपर्क साधावा.
2) ज्या वाळू गटाची हातची किंमत रूपये 10 लक्ष पेक्षा जास्त आहे त्याकरीता ई-निविदा फी रक्कम रूपये 5000/-मात्र (अधिक सर्व्हीस टॅक्स ) अधिक प्रोसेसिंग फी रू. 1350/- मात्र (अधिक सर्व्हीस टॅक्स ) ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.
3) ज्या वाळू गटाची हातची किंमत रूपये 10 लक्ष व त्यापेक्षा कमी आहे, त्याकरीता ई-निविदा फी रक्कम रूपये 2000/- (अधिक सर्व्हीस टॅक्स )अधिक प्रोसेसिंग फी रू. 1350/- मात्र (अधिक सर्व्हीस टॅक्स ) ऑनलाईन पध्दतीने भरावा लागेल.
4) ज्या वाळू गटाची हातची किंमत रूपये 10 लक्ष पेक्षा जास्त आहे, त्या वाळू गटासाठी रक्कम रूपये 3 लक्ष किंवा अपसेट प्राईजच्या 20 % यांपैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम (EMD) म्हणून भरणा करावी लागेल.
5) ज्या वाळू गटाची हातची किंमत रूपये 10 लक्ष पेक्षा कमी आहे त्या वाळू गटासाठी अपसेट प्राईसच्या 20 % रक्कम अनामत रक्कम (EMD) म्हणून भरणा करावी लागेल.
6) सदरच्या रकमा हया एनईएफटी / आरटीजीएस / नेटबॅंकीग/क्रेडीटकार्ड / डेबीटकार्ड (एनईएफटी / आरटीजीएस ) पध्दतीनेच अदा कराव्या लागतील.
7) वाळु उत्खनन व वाहनासाठी महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारीत सुलभ Mahamining प्रणाली अथवा शासनाकडून सुचीत करण्यात आलेली प्रणाली किंवा जिल्हाधिकारी जळगांव निश्चित करतील अशी बारकोड युक्त संगणकीय प्रणाली वाळू लिलावधारकास या प्रणालीचा वापर करणे अनिवार्य राहील.
8) सदर प्रणालीनुसार लिलावधारकास त्याचे 3 मोबाईल नंबर आवश्यकता भासल्यास रजिष्टर करणे बंधनकारक राहील.
9) लिलावधारक निर्धारीत वाळू गटातून वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनांमधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळू गटाचे नांव /क्रमांक , वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणामधील

अंतर इ. तपशिल नोंदणीकृत मोबाईल वरुन एसएमएस द्वारे (sms) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनुसार त्यास एसएमएस द्वारे Invoice नंबर प्राप्त होईल. सदर पावती MICR पेपर (चेक पेपर) असेल त्यावर युनिक बारकोड असेल Void Pantograph, QR कोड असेल त्यावर Fugitive Ink Background प्रिंन्ट केली असेल सदर पावतीवर Invoice नंबर, पावती वैधता, व Invoice क्रमांक तयार झालेली दिनांक व वेळ या बाबी टाकणे लिलावधारकास बंधनकारक आहे. असा Invoice नंबर प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकास वाळू/ रेतीची वाहतुक करता येणार नाही. Invoice नंबर शिवाय वाहतुक केल्यास ती अवैध ठरवून त्यावर प्रचलित कायदे व धोरणा नुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

10) वाळू/रेती वाहतुक करणा-या चालकाकडे उक्त Invoice नंबर नसेल किंवा Invoice नंबरचा कालावधी संपलेला असेल तर तशी वाहतुक अवैध ठरेल.

11) वाळू/रेतीची वाहतुक करणा-या वाहनचालकाकडे वैध Invoice नंबर आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसुल यंत्रणेकडून, नियुक्त भरारी पथकाकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देशित करतील अशा व्यक्तींकडून केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध Invoice नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल किंवा ठिकाण चुकीचे असेल तर, सदर वाळूचे उत्खनन/वाहतुक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 मधील कलम 48 (७) व (८), महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 आणि वाळू निर्गती धोरण शासन निर्णय दिनांक 12.3.2013 मधील तरतुदीनुसार त्याविरुध्द कारवाई करण्यांत येईल.

12) **उक्त प्रणालीचा अवलंब करणे सुलभ व्हावे, याद्दष्टीने सर्वोच्च बोलीद्वारे लिलावधारकास वाळू गट निर्धारीत झाल्यास आणि त्याने त्याबाबतची ¼ रक्कम जमा केल्यास अशा लिलावधारकांना जिल्हाधिकारी यांचे मार्फत प्रशिक्षण देण्यांत येईल.**

13) **जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या मंजूरीतील अटी व शर्ती संबंधित यशस्वी निवीदाकार/ लिलावधारक यांचेवर बंधनकारक राहतील.**

14) **भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपुर यांचे कडील पत्र क्र. एसटीसी/ डीएमएफ/ 1035/2016/ 2189 दिनांक 05 ऑगस्ट 2016 अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आलेली असून गौण खनिजाचे स्वामित्वधनाचे 10 % रक्कम जमा करावी लागेल.**

15) **महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/0316/प्र.क्र.248/ख, दिनांक 18.03.2017 अन्वये यशस्वी लिलावधारकाने लिलावाची 100 % रक्कम भरल्यानंतर करावयाचा करारनामा लिलावाची रक्कम 10 लक्ष असल्यास लिलावाच्या रकमेच्या 0.1 % किंवा 100/- यापैकी जे अधिक असेल तेवढे मुद्रांक शुक्ल आकारण्यात येईल तसेच लिलावाची रक्कम 10 लक्ष पेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रकमेच्या 0.2% मुद्रांक शुक्ल आकारण्यात येईल**

16) **तसेच ई-निविदाकार नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा (मागील तीन वर्षाचे), पॅनकार्ड, टीन (TIN) क्रमांक, GST क्रमांक , कंपनी किंवा फर्म असल्यास रजिष्ट्रेशनची प्रत व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे रक्कम रुपये 100/- मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र, ई-मेल आयडी, आधार कार्ड, अधिकृत संस्थेकडून प्राप्त डिजीटल सिग्नेचर (Digital Signature) इ. कागदपत्रांसह ऑनलाइन पध्दतीने ई निविदा सादर करण्यांचा अंतिम दिनांक जाहिरात प्रसिध्दी पासून दिनांक २८/12/2017 रोजी सायंकाळी 6:00 वाजेपावेतो आहे.**

ई-निविदाधारकांनी स्वाक्षरी केलेली निविदा कागदपत्रे, विहीत प्रतिज्ञापत्र, नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन कार्डची प्रत, टीन क्रमांकाची प्रत, GST क्रमांकाची प्रत तसेच निविदाकार कंपनी किंवा फर्म असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र, ई-मेल आयडी, आधार कार्ड, अधिकृत संस्थेकडून प्राप्त डिजीटल सिग्नेचर (Digital Signature) सोबत आणणे आवश्यक आहे. **सर्वोच्च किंवा यशस्वी निविदाधारकास वरील कागदपत्रे त्वरीत सादर करणे बंधनकारक राहील. हातची किंमत (अपसेट प्राईज) पेक्षा अधिक रक्कम असलेल्यांचीच ई-निविदा/ई-ऑक्शन स्विकारण्यांत येईल.**

ई-निविदा आणि ई-ऑक्शन स्विकारणे किंवा नाकारणे तसेच ई-ऑक्शन प्रक्रीया स्थगित अगर रद्य करण्याची व प्रकीयेतील कोणत्याही टप्प्याचा कालावधी वाढविणे तसेच आगामी कालावधीत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त आदेश / सूचनांच्या अनुषंगाने काही अतिरीक्त अटी शर्ती लागू करणे यासंबंधीचे अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी जळगांव यांनी राखून ठेवलेले आहेत.

ऑन लाईन ई-निविदा / ई-लिलावाच्यावेळी कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्व्हर, विदयुत किंवा अन्य तांत्रिक कारणामुळे अडथळा आल्यास जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**अपर जिल्हाधिकारी जळगांव**

# <u>जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव</u>

**वाळू/रेती लिलाव सन 2017- 2018 करीता ई टेंडरींग आणि ई-ऑक्शन अटी व शर्ती**

**सन 2017-2018 करिता महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 चे नियम 68 ते 70 नुसार, तसेच वाळू/रेती निर्गती बाबत महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/0512/प्र.क्र.300/ख, दिनांक 12/03/2013 नुसार**

<u>अटी व शर्ती :-</u>

1. **सदरील लिलाव हे जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या पर्यावरण मंजूरीतील अटी व शर्तीनुसार ई निविदा-आणि ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव करण्यांत येत आहे.**

2. **पर्यावरण अनुमतीनुसार तसेच वाळू निर्गती धोरण शासन निर्णय दिनांक 12.3.2013 नुसार सदरचे लिलाव हे मंजुर करण्यात आलेल्या वाळू साठा संपण्यापर्यत किंवा दिनांक 30 सप्टेंबर 2018 पर्यंतच्याच कालावधीकरीता आहेत.**

3. एखाद्या वाळू गटास पर्यावरण विभागाने मंजूरी नाकारल्यास त्यावाळू गटाचा लिलाव रद्द करण्यात येईल तसेच त्यागटासाठी भरणा केलेली अनामत रक्कम संबंधित लिलावधारकास परत करण्यात येईल.

4. वाळू गटासाठी निश्चित करण्यांत आलेल्या अपसेट प्राईज (हातची किंमत) पेक्षा अधिक बोलीने ई-ऑक्शनद्वारे लिलावाला सुरुवात करण्यांत येईल.

5. ई-टेंडर/ई-ऑक्शन द्वारे लिलावात बोलण्यांत आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाचा 10 दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यांत येईल.

6. भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपुर यांचे कडील पत्र क्र. एसटीसी/ डीएमएफ/ 1035/2016/ 2189 दिनांक 05 ऑगस्ट 2016 अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आलेली असून गौण खनिजाचे स्वामित्वधनाचे 10 % रक्कम जमा करावी लागेल.

7. ई-टेंडर/ई-ऑक्शन द्वारे लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणून रुपये 3 लाख किंवा अपसेट प्राईसच्या 20 % यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल.

परंतु ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10 लाखापेक्षा कमी असेल तर, हातच्या किंमतीच्या 20 % रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल. ज्या लिलावधारकाची अत्युच्च बोली/ निवीदा स्विकारण्यांत येईल. त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या 1/4 रकमेत समायोजित करण्यांत येईल. ज्या लिलाव धारकांची बोली / निवीदा स्विकारण्यांत येणार नाहीत त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर परत करण्यांत येतील.

8. लिलावाने घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळांत अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलबध आहेत किंवा नाही याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबददल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

9. ई-टेंडर / ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचा राहील व सदर निर्णय लिलावाच्या दिवशीच कळविण्यांत येईल.

**10. ई-टेंडर / ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्विकारल्यानंतर तसेच ¼ रक्कम भरल्यानंतर 15 दिवसांत बोलीची उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्विकारणा-या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- मात्रच्या मुद्रांकानावर (स्टॅप पेपर) करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली ¼ रक्कम जप्त करण्यांत येईल व संबंधित रेती / वाळू गटाचा फेरलिलाव करण्यांत येईल. तसेच विहीत कालावधीत करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणारे कोणत्याही नुकसानाची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी वरील अ.क्र. 7 प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहिलेली 75% रक्कम सर्वोच्च बोली स्विकारल्यापासून 15 दिवसांत एकरकमी भरावी लागेल. लिलावधारकाने शिल्लक राहिलेली 75% रक्कम भरल्यानंतर व करारपत्रक केल्यानंतर त्याला वाळू स्थळाचा प्रत्येक्षात ताबा उशिरात उशिरा 7 दिवसांत देण्यांत येईल.**

11. ज्यावेळी रेती/वाळू लिलाव रदद करण्यांत येईल अशावेळेस त्यावेळी रेती/वाळू क्षेत्राचा नव्याने ई-टेंडर /ई-ऑक्शन पध्दतीने फेर लिलाव करण्यांत येईल. फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करण्यांत येईल. तथापि फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

12. लिलावाने घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षीत वाळू साठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक असलेले रस्ते आहेत किंवा नाहीत ? याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील त्यानंतर याबददलच्या कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

13. लिलावधारक त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती /वाळू काढल्याने जमीनीची धुप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा बांधकाम यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणाहून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतिम असतील.

14. विहीत केलेल्या मर्यादेच्या पलीकडे असलेल्या क्षेत्रातून रेती / वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमीनी लिलावाने देण्यांत आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्यातरी रेती /वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते/ पायवाटा म्हणून वापरणा-या जमीनीतून रेती / वाळू काढता येणार नाही.

15. कोणत्याही रेल्वेच्या पूलाच्या कोणत्याही बाजूने 600 मिटर्स (2000 फुट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी नाल्यांवर पुल आहेत त्यांच्या स्तंभापासून 100 मिटर्स पर्यंत रेती / वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

16. जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सिमा निश्चित करून दर्शविण्यांत यावी.

17. वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/ नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व निविदाधारकांवर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-यांकडून करण्यांत येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय

अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसूलाच्या वसुलीप्रमाणे संबंधित लिलावधारका कडून वसुल करण्यांत येईल.

18. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

19. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिका-याने केला असेल त्या जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची असेल. तसेच वाळू साठवणूक केलेल्या ठिकाणाची संबधीत तहसिलदार यांच्याकडून परवानगी घेणे आवश्यक राहील. वाळू / रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू /रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा / रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसांत उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यांत आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्याच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासना विरुध्द दावा करता येणार नाही.

तसेच लिलावाचा कालावधी संपल्यांनतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू / रेती साठा करण्यास परवानगी देता येणार नाही, किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुय्यम वाहतुक पासेस देता येणार नाही.

20. लिलावधारकास वाळूची/ रेतीची वाहतुक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/ संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

21. लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर त्यांच्या जबाबदारीवर अदा करावे.

22. लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या / मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सिमा दर्शविणारे खांब उभारावे.

23. लिलावघेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी 30 सप्टेंबर 2018 रोजी किंवा मंजूर परिमाणाची उचल केल्यावर संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमुद केलेल्या कालावधी, परवानगी दिलेल्या साधनाच्या साहाय्याने वाळू / रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलवून दिला जाणार नाही. तसेच लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

24. उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतुकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलाव धारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नविन रस्ता मिळण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत. या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती / वाळू घाट बदलवून दिला जाणार नाही.

25. नदीपात्रातून /नाल्यातून अथवा त्याला रेती /वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केलेले असेल त्या क्षेत्रातून रेती / वाळू उत्खनन करतांना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व जबाबदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

26. रेतीचे /वाळूचे नदीपात्रातून /नाल्यातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणा नंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यांत येऊ नये. नदीपात्रात / नाला याचे पात्र बदलवून अथवा त्यांना हानी पोहचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

27. लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहचविता कामा नये.

28. रेती / वाळू उत्खनन करतांना अथवा हलवितांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यांत दयावी.

29. वाळू/रेती लिलावधारकाने नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/ वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यांत येईल. दंडनियम कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यांत येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतुक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, महसुल अधिकारी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणा-या अधिका-यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन दयावीत.

30. गौणखनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतुकीच्या संबंधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे महसुल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपुर यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन दयावीत.

31. लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रुपये 3 लाख (रुपये तीन लाख) किंवा अपसेट प्राईसच्या 20 टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांचेकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतु ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10 लाखपेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20 % रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. ही रक्कम लिलावधारकाने लिलावाची मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यांत येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पूर्णत: जप्त करण्यांत येईल.

32. लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौणखनिज उत्खनन नियमातील तरतुदीनुसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातील तरतुदीनुसार तसेच अन्य कायदे/नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पुर्ण उपयोग गौणखनिज म्हणूनच केला पाहिजे.

33. लिलावधारक / परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तसेच विनियमन नियमांच्या तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

34. कोल्हापुर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे/ बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

35. सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

36. वाळूची वाहतुक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतुक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

37. अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

38. अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मधील कलम 48 (७) व (८) नुसार तसेच इतर लागू होणा-या सर्व कायदे व नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

39. लिलाव मंजूर करण्यांत आलेल्या वाळू गटांना वाळू उत्खननाकरीता सक्शन पंपाचा वापर करावयाचा असल्यास अशा वाळूगटांना भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची तसेच पर्यावरण विभाग यांचे अभिप्राय घेवून शासनाची परवानगी मिळाल्यानंतर रितसर परवानगी देण्यांत येईल.

40. ई-टेंडर/ई-ऑक्शन मध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती/संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

41. लिलावधारकाने निवीदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी व शर्तीचे पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्यानंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यांत येईल.

42. दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे जनहितास्तव कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

43. **शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.**

44. इच्छुक व्यक्तींना ई-निविदा आणि ई-लिलाव अथवा दोन्हींमध्ये भाग घेता येईल. ज्या व्यक्तींनी ई-निविदा भरलेली असेल त्यांना पुन्हा त्याच वाळूस्थळाच्या ई-लिलावाकरीता अनामत रक्कम (EMD) , फॉर्म फी व प्रक्रीया फी भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

45. ज्या वाळू घाटांची अपसेट प्राईस रूपये 10 लाख ते 50 लाख आहे अशा वाळू घाटांसाठी रूपये 5000/-मात्र रकमेच्या पटीनेच बोली लावणे बंधनकारक राहील. तसेच रूपये 50 लाखापेक्षा जास्त अपसेट प्राईस असलेल्या वाळू घाटासाठी रूपये 10,000/- मात्र रकमेच्या पटीनेच बोली लावणे बंधनकारक आहे.

46. ई लिलावासाठी सकाळी 10:00 ते सायं. 6:00 वाजेपर्यंत (जाहिरातीत दिलेल्या वेळेनुसार) कालावधी असेल, जर कोणी निविदाधारकाने शेवटचे 05 मिनिटांमध्ये बोली लावण्याचा प्रयत्न केल्यास लिलावाच्या कालावधीत 10 मिनिटांनी वाढ होईल. तथापि अपर जिल्हाधिकारी यांना उचित वाटल्यास अशी वाढ त्यापुढे वाढविण्याचे अधिकार राहतील.

47. ताबा देण्यापूर्वी मंजूर वाळू/रेती गटातून केलेले उत्खनन अवैध असल्याने त्याबाबत दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यांत येईल.

48. लिलावधारकाने त्याला वाटप/मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच सक्षम प्राधिका-यांच्या पूर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नांव, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

49. रेती/वाळू ठेक्याचा कालावधी जास्तीत जास्त **30 सप्टेंबर** 2018 किंवा मंजूर केलेला वाळू साठा संपेपर्यंत यापैकी जे अगोदर होईल त्या कालावधी पावेतो राहील. त्यानंतर ठेका आपोआप संपुष्टात येईल. ठेक्याची मुदत संपल्यानंतर केलेले उत्खनन हे अवैध उत्खनन असल्याने तशी बाब आढळून आल्यास दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यांत येईल.

50. भूजल सर्वेक्षण शुल्क म्हणून रू. 5000/- चा डि.डी. (धनाकर्ष) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे नावाने जमा करावा लागेल.

51. लिलावासाठी ई-निविदा भरू इच्छिणा-या व्यक्तींना ई-निविदा शुल्क रूपये 5000/- **मात्र** तसेच ज्या वाळू गटाची हातची किंमत रूपये 10 लाख व त्यापेक्षा कमी असेल अशा गटासाठी निवीदा शुल्क रूपये 2000/- **मात्र** शासनाकडेस ऑनलाईन पेमेंटद्वारे भरणा करावा लागेल. त्याशिवाय ई-निविदा उघडण्यात येणार नाही.

52. मा. न्यायालयाने कोणत्याही वाळूपट्ट्याबाबत/ लिलावाबाबत काही आदेश/निर्णय दिल्यास निविदाधारकांवर बंधनकारक राहील. तसेच रिट याचिका क्रं.4830/2010 मध्ये दिनांक 26/10/2010 रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

53. दर महिन्याचे दुस-या व चौथ्या शनिवार तसेच दर रविवारी मंजूर केलेल्या रेती घाटातून रेती / वाळू उपसा करण्याचे काम बंद ठेवावे लागेल.

54. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी निकामी वाळूचे साचलेले ढीग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

55. लिलावधारकास वाळू / रेती गटाचा स्वामित्वधनावरील मुल्यांच्या 2 टक्के रक्कम पर्यावरण शुल्क म्हणून शासनास जमा करावी लागेल.

56. आयकर व मुद्रांक शुल्क रक्कम शासन जमा करूनच करारनामा करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. मंजूर केलेल्या रेतीघाटाचा स्वखर्चाने तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी मोजणी व सिमांकन केलेला नकाशाच्या दोन प्रती करारनामा करण्यापूर्वी सादर करून करारनामा करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. त्यानुसार मोजणी नकाशातील क्षेत्रावर लिलावधारकाला ताबा देण्यांत येईल.

57. नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक व विक्रीकर विभागाचा टिन क्रमांक,GST क्रमांक, कंपनी / फर्म असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र, ई-मेल आयडी, आधार कार्ड, अधिकृत संस्थेकडून प्राप्त डिजीटल सिग्नेचर (Digital Signature) असलेल्या निविदा धारकांच्याच निविदा वैध ठरविल्या जातील. ज्या निविदा धारकांनी निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे जसे पॅन क्रमांक, व टिन क्रमांक व आयकर भरल्याचा पुरावा जोडले नाहीत आणि ऑन लाईनने रक्कम जमा न झालेली अशा निविदा धारकांची निविदा अवैध ठरविण्यांत येईल.

58. वाळू उत्खनन व वाहतूक वाहनाची यादी वाळू उपसापूर्वी जिल्हा व तहसिलदार कार्यालयास सादर करावी लागेल.

59. रेती / वाळू उत्खननाची वेळी सकाळी 6-00 ते सायंकाळी 6-00 वाजेपर्यंतच राहील. त्यानंतर केलेले उत्खनन अवैध समजून नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

60. भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपुर यांचे कडील पत्र क्र. एसटीसी/ डीएमएफ/ 1035/2016/ 2189 दिनांक 05 ऑगस्ट 2016 अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आलेली असून गौण खनिजाचे स्वामित्वधनाचे 10 % रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठान ,जळगांव या नांवे जिल्हाधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे संयुक्त खाते क्रमांक (A/C No.) 36130198143 मध्ये जमा करावी लागेल.

61. आयकर अधिनियमाच्या कलम 206 (क) नुसार रेती लिलावाच्या रकमेच्या 2 टक्के आयकर (T.D.S.) लिलावधारकाने संबंधित तहसिलदार यांचेमार्फत शासनजमा करून त्याची प्रत जिल्हा खनिकर्म अधिकारी, जळगांव यांचेकडेस सादर केल्याशिवाय वाहतूक परवाने दिले जाणार नाहीत.

62. शासन ज्या प्रमाणे GST वसूली बाबत निर्देश देईल. त्याप्रमाणे लिलावधारक यांच्यावर सदर बाब बंधन राहील. व त्याप्रमाणे GST अदा करावी लागेल.

63. यशस्वी निविदाकारास भूपृष्ठ भाडेचा भरणा करावा लागेल.

64. तहसिलदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी लिलावाचा ताबा घ्यायला बोलावल्यावर अनुपस्तितीत राहिल्यास वा कोणत्याही कारणास्तव मुदतीत ताबा न घेतल्यास लिलावासाठी भरलेल्या सर्व प्रकारच्या

रकमा, अनामत रक्कम व बॅक गॅरंटीसह जप्त करुन सरकारी खजिन्यात भरण्यात येईल व लिलावधारकास काळया यादीत टाकण्यात येईल.

65. वाळू / रेती निर्गती बाबत महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/0512/प्र.क्र.300/ख, दिनांक 12/03/2013 अन्वये निश्चित करण्यात आलेल्या वाळू धोरणातील अटी व शर्ती लिलावधारकास बंधनकारक राहतील.

66. वाळू / रेतीस्थळाचा ताबा देण्यासाठी अटी व शर्ती मध्ये शिथीलता व कालावधी मध्ये फेरफार करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी जळगांव यांना असतील.

67. तसेच महाराष्ट्र शासनाकडील वेळोवेळी पारीत होणारे शासन निर्णयातील तसेच राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाकडील पारीत होणारे सर्व आदेशातील अटी व शर्ती व नियम लागू राहतील.

68. <u>पर्यावरण विषयक अटी व शर्ती</u> :-

**जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या पर्यावरण मंजूरीतील अटी व शर्तीनुसार संबंधित यशस्वी निवीदाकार/ लिलावधारक यांचेवर बंधनकारक राहतील.**

1) ई निविदेद्वारे /लिलावाद्वारे घेतलेल्या स्थळाचा किंवा वाळू ठेक्याचा कालावधी लिलाव तारीख घेण्याची तारीख कोणतीही असली तरी मंजुर परिमाण संपल्याचा दिनांक किंवा दिनांक 30 सप्टेंबर 2018 यापैकी जो आधी असेत तो पर्यंत असा राहील.

2) **मा.राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल केलेली याचिका क्र.91/2017 (W.Z) M.A 289/2017 मधील आदेशानुसार निविदाधारक / लिलावधारक यांना लिलावात घेतलेल्या वाळू घाटाचा खाणकाम आराखडा ताबा घेणेपूर्वी तयार करुन सादर करावा लागेल**

3) **निविदारधारक/लिलावधारक यांनी ठेका मंजूर झालेवर संक्शन पंपाद्वारे करण्यात येणा-या वाळू उत्खननासाठी शासनाची पर्यावरण अनुमती तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र प्राप्त् करून घेणे आवश्यक आहे. तथापि मा.राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल केलेली याचिका क्र.MA No.601/602/608/609/2017, OA368/2015 मधील आदेश व मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले आदेश लागू राहतील.**

4) महाराष्ट्र गौणखनिज-उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 शासन निर्णय दिनांक 12 मार्च 2013 व पर्यावरण व वनविभाग यांचेकडील मेमोरॅंडम दिनांक 24/12/2013 मधील तरतुदींचे उल्लंघन होता कामा नये.

5) वाळूचे नदीपात्रातून/ नाल्यातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यांत येऊ नये. तसेच नदीपात्र/ नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी निविदाधारकाने/ लिलावधारकाने घ्यावयाची आहे. तसेच कोणत्याही परिस्थितीत किमान 2 मी. वाळूचा स्थर राहील. अशा प्रमाणातच उत्खनन करणे बंधनकारक राहील.

6) लिलावधारकाने वाहनातून वाळू वाहतूक करतांना वाहनाची क्षमतेएवढीच वाहतूक करणे आवश्यक आहे. ते प्रमाण जास्तीत जास्त 3 ब्रास मर्यादेपर्यंतच असेल.

7) लिलावधारकाने वाळू स्थळातून उत्खनन करतांना नदी काठावरील जीवसृष्टी व पक्षांची घरटी यांना हानी पोहोचविता कामा नये.

8) मंजूर क्षेत्रापैकी कमीतकमी 20 % क्षेत्रामध्ये नदीतीरावर/ रस्तयाचे कडेला झाडे लावून हरीयाली (Green Belt) करावी लागेल. उत्खननाच्या वेळी Soil erosion व Silt Management च्या बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यांत याव्यात.

9) जमीनीची धूप होऊ नये याकरिता योग्य त्या उपाय योजनांचा अवलंब करण्यांत यावा.

10) मा. सर्वोच्च न्यायाल व राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांच्या नियमांचे उल्लंघन होता कामा नये.

11) लिलावधारकाने वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टिक पेपरने/ ताडपत्री आच्छादित करूनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यांत यावी.

12) लिलावधारकास पर्यावरण शुल्कापोटी लिलावात गेलेल्या वाळूच्या स्वामित्वधनावरील मूल्याच्या 2 % रक्कम ही पर्यावरण शुल्क म्हणून राष्ट्रीयकृत बँकेत (Bank Gurantee) बँक गॅरटी म्हणून ठेवावी लागेल. पर्यावरण विषयक अटींचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यांत येऊन बँक गॅरटी शासन जमा करण्यांत येईल.

13) लिलावधारकाने वाळू स्थळातून उत्खनन करतांना नदी काठावरील/ खो-यातील मातीचे गुणधर्म किंवा वैशिष्टये यांना हानी पोहोचविता कामा नये.

14) सिल्टेशन (Siltation) स्टडीबाबतचा अहवाल रेती/ वाळू उत्खननापूर्वी अथवा वाळू उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी, तज्ञ एजन्सी जसे NIO/CWPRS कडून करून त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांचेकडेस सादर करावा लागेल.

15) ज्या ठिकाणी कासवांची घरटी (Turtle Nesting) असेल त्या ठिकाणाहून वाळू उत्खनन करण्यात येऊ नये.

**<u>पर्यावरण विषयक सर्वसाधारण अटी व शर्ती</u>**

1) लिलावधारकाने उत्खननापूर्वी त्याला मंजूर असलेल्या उत्खनन क्षेत्रांचे महसूल अधिकारी/ खनिकर्म अधिकारी, कर्मचारी यांचेकडून सिमांकन करून घ्यावे व त्याबाबत सक्षम अधिका-यामार्फत तपासणी करणे आवश्यक आहे.
2) लिलावधारकाने उत्खनन करण्यापूर्वी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
3) लिलावधारकाने नदीप्रवाहात वाळूचे उत्खनन कर नये.
4) लिलावधारकाने रात्रीचे वेळी वाळू उत्खनन व वाहतूक करू नये.
5) लिलावधारकाने पूल अथवा इतर ठिकाणचे संरक्षित क्षेत्रामध्ये उत्खनन व वाहतूक करू नये.
6) लिलावधारकाने पुरातत्व शास्त्रीय ठिकाणालगत वाळूचे उत्खनन करू नये.
7) लिलावधारकाने वाळू स्थळातून उत्खनन करणेसाठी जर तेथे उपलब्ध असणारे पाणी बाहेर काढणे आवश्यक असेल तर त्यबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक असेल.
8) लिलावधारकाने हरित पट्टा तयार करतांना रोपांची निवड करणेकामी संबंधित वन अधिकारी किंवा उद्यान विद्या अधिकारी यांचे सहाय्य घ्यावे.
9) लिलावधारकाने सार्वजनिक ठिकाणी वाळू वाहतूक करणा-या वाहनांची पार्किंग करू नये.

10) लिलावधारकाने महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांचे सल्लयाने प्रदूषण टाळणेबाबतच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. तसेच, कोणत्याही वाहनातून इंधन अथवा ग्रीसची गळती होणार नाही, याबाबतची दक्षता घ्यावी.

11) लिलावधारकाने वाळूची वाहतूक करतांना त्या भागातील रस्त्यांना हानी होणार नाही. त्याबाबतची दक्षता घ्यावी.

12) उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा करून द्यावी लागेल.

13) लिलावधारकाने आवश्यकता भासल्यास उत्खननाच्या जागेवर मजूरांना जेवण बनविणे, शुध्दपाणी वैद्यकीय उपचार व इतर सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल.

14) लिलावधारकाने उत्खनन क्षेत्रात व सभोवतालच्या क्षेत्रात हवेची शुध्दतेची तपासणी करणे आवश्यक आहे.

15) लिलावधारकाने उत्खनन क्षेत्रात केंद्रीय प्रदूषण मंडळाने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक ध्वनीप्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

16) लिलावधारकाने पर्यावरणविषयक अटी व शर्तींचे पालन केल्याबाबतचा दर तिमाही अहवाल संबंधित तहसिलदार यांच्यामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

69. वरीलपैंकी कोणत्याही अटी व शर्तींचा लिलावधारकाने भंग केल्यास प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल तसेच अनामत रक्कम व बँक हमीची रक्कम जप्त करण्याची सुध्दा कार्यवाही करण्यात येईल.

अपर जिल्हाधिकारी जळगांव

## जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (गौण खनिज शाखा)

सन 2017-18 या वित्तिय वर्षासाठी वाळू लिलावाचा तपशिल

### 28 वाळू स्थळांसाठी फेर ई - ऑक्शन आणि ई- निविदा सुचना

| लॉट क्रमांक | वाळू गट क्रमांक | वाळू स्थळाचे नाव | तालुका | नदी/ ओढा नांव | वाळू साठया लगतचे गट क्रमांक | उपलब्ध होऊ शकणारा वाळूसाठा (ब्रास) | वाळू लिलावासाठी प्रस्तावित अपसेट प्राईज रक्कम रु. | अनामत रक्कम 20 टक्के रक्कम | ई-निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | 1 | नागझिरी | जळगाव | गिरणा | 3, 5, 6 | 4240 | 27182640 | 5436528 | 5000 |
| | 2 | उत्राण अ.ह. 3 | एरंडोल | गिरणा | 8 | 4081 | 14054964 | 2810993 | 5000 |
| | 3 | उत्राण अ.ह. 4 | एरंडोल | गिरणा | 9 | 4576 | 15759744 | 3151949 | 5000 |
| | 4 | उत्राण अ.ह. 5 | एरंडोल | गिरणा | 16 | 1855 | 6388620 | 1277724 | 5000 |
| | 5 | उत्राण अ.ह. 6 | एरंडोल | गिरणा | 17 | 1855 | 6388620 | 1277724 | 5000 |
| | 6 | उत्राण गु.ह. 1 | एरंडोल | गिरणा | 1 | 3710 | 12777240 | 2555448 | 5000 |
| | 7 | उत्राण गु.ह. 2 | एरंडोल | गिरणा | 2 | 4770 | 16427880 | 3285576 | 5000 |
| | 8 | उत्राण गु.ह. 6 | एरंडोल | गिरणा | 25 | 3710 | 12777240 | 2555448 | 5000 |
| | 9 | हनमंतखेडेसीम 1 | एरंडोल | गिरणा | 1 ते 5, 13, 14, 19 | 4364 | 15029616 | 3005923 | 5000 |
| | 10 | हनमंतखेडेसीम 2 | एरंडोल | गिरणा | 95 ते 100 | 4307 | 14833308 | 2966662 | 5000 |
| | 11 | नांदेड 2 | धरणगाव | तापी | 14,18 | 7531 | 15928065 | 3185613 | 5000 |
| | 12 | आव्हाणी | धरणगाव | गिरणा | 175, 176, 167, 166, 165, 163, 162 व 160 | 7067 | 25992426 | 5198485 | 5000 |
| | 13 | उंदिरखेडे 1 | पारोळा | बोरी | 514, 515, 434, 562, 561 | 3127 | 4787437 | 957487 | 5000 |
| | 14 | उंदिरखेडे 2 | पारोळा | बोरी | 432, 431, 430, 334, 333 | 1546 | 2366926 | 473385 | 5000 |

अप्पर जिल्हाधिकारी जळगाव

## जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (गौण खनिज शाखा)

### सन 2017-18 या वित्तिय वर्षासाठी वाळू लिलावाचा तपशिल

### 28 वाळू स्थळांसाठी फेर ई - ऑक्शन आणि ई- निविदा सुचना

| लॉट क्रमांक | वाळू गट क्रमांक | वाळू स्थळाचे नाव | तालुका | नदी/ ओढा नांव | वाळू साठया लगतचे गट क्रमांक | उपलब्ध होऊ शकणारा वाळूसाठा (ब्रास) | वाळू लिलावासाठी प्रस्तावित अपसेट प्राईज रक्कम रु. | अनामत रक्कम 20 टक्के रक्कम | ई-निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 2 | 15 | पातोंडी | मुक्ताईनगर | तापी | 210, 211, 212 व गावठाण | 2608 | 3476464 | 695293 | 5000 |
| | 16 | भोकरी | मुक्ताईनगर | तापी | 15, 16, 17, 17ब, 18ब, 19, 20 | 2182 | 2308556 | 461711 | 5000 |
| | 17 | सुटकार | चोपडा | तापी | 23, 24, 25, 28, 29 | 849 | 1957794 | 391559 | 5000 |
| | 18 | घाडवेल भाग 1 | चोपडा | चंपावती | 149, 150, 151, 153 | 1855 | 4246095 | 849219 | 5000 |
| | 19 | घाडवेल भाग 2 | चोपडा | तापी | 164, 165, 166 | 3816 | 8734824 | 1746965 | 5000 |
| | 20 | बुधगाव 1 | चोपडा | तापी | 427 | 4580 | 10483620 | 2096724 | 5000 |
| | 21 | बुधगाव 2 | चोपडा | तापी | 428 | 2862 | 6551118 | 1310224 | 5000 |
| | 22 | रहिपुरी 1 | चाळीसगाव | गिरणा | 74 | 3816 | 8566920 | 1713384 | 5000 |
| | 23 | रहिपुरी 2 | चाळीसगाव | गिरणा | 93 | 5654 | 12693230 | 2538646 | 5000 |
| | 24 | भऊर 1 | चाळीसगाव | गिरणा | 141, 412/2, 143 | 5035 | 11303575 | 2260715 | 5000 |
| | 25 | भऊर 3 | चाळीसगाव | गिरणा | 167 चा भाग,169,172 व 174 चा काही भाग | 4415 | 9911675 | 1982335 | 5000 |
| | 26 | भऊर 4 | चाळीसगाव | गिरणा | 205 | 6360 | 14278200 | 2855640 | 5000 |
| | 27 | भऊर 5 | चाळीसगाव | गिरणा | 218 चा 75% भाग | 6502 | 14596990 | 2919398 | 5000 |
| | 28 | तामसवाडी - टोळी | पारोळा | बोरी | 871, 872, 873, 748, 897, 892, 874, 875, 53, 54 | 1643 | 2515433 | 503087 | 5000 |

(शिक्का: अपर जिल्हाधिकारी जळगांव)

(स्वाक्षरी)
अपर जिल्हाधिकारी जळगांव

**ई-निवीदा/ ई-ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या र.रु. 100/- चे मुद्रांकीत स्टँप पेपरवर दोन साक्षीदाराचे स्वाक्षरीसह दयावयाचे प्रतिज्ञापत्र. (नमुना)**

**प्रतिज्ञापत्र.**

मी नामे (पुर्ण नांव) ------------------------------------------------------------------------

रा. (पोष्टाचा पुर्ण पत्ता द्यावा) ------------------------------------------------------------

तालुका ------------------------- जि. -------------------- पि.नं.-------------------

माझे/माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक ------------------------- टिन/ जीएसटी क्रमांक -----------------------

मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी रेती/ वाळू घाटाच्या ई-निवीदेतील सर्व अटी व शर्तीची व **जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या पर्यावरण मंजूरीतील अटी व शर्तीचे** जाणीव करुन घेतली आहे. मी ई-निविदेत प्रस्तावित केलेल्या किमतीत वाळू घाट घेण्यास इच्छूक असून अपसेट प्राईजच्या 20 टक्के अनामत रक्कम मी शासन जमा करीत आहे.

मला सदर वाळू घाट मंजूर झाल्यास ¼ रक्कम मी त्याचदिवशी ऑनलाईन पध्दतीने पेमेंटद्वारे शासनाकडेस जमा करेल. तसेच ई-टेंडर / ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्विकारल्यानंतर व ¼ रक्कम भरल्यानंतर 15 दिवसांत बोलीची उर्वरीत ¾ रक्कम भरण्यास तयार असून याबाबत हमीसुध्दा याद्वारे करुन देत आहे. वरील प्रमाणे हमीपत्र /करारपत्र करुन न दिल्यास मी भरलेली ¼ रक्कम जप्त करण्यांत येईल याची मला जाणीव आहे. तसेच मी घेतलेल्या रेती / वाळू गटाचा फेरलिलाव करण्यांत येईल. मी घेतलल्या वाळू गटाचा फेरलिलाव झाल्यास माझे होणारे आर्थिक नुकसानाची जबाबदारी शासनावर राहणार नाही. ताबा घेण्यापूर्वी संपूर्ण रक्कम मी ऑनलाईन पेमेंटद्वारे भरणा करून मंजूर वाळू घाटाचे निष्पादन करून घेण्याची हमी देत आहे. असे न केल्यास मी जमा केलेली 20 टक्के अनामत व लिलावाच्या सर्वोच्च बोलीच्या ¼ रक्कम शासन जमा करण्यांत यावी व नियमानुसार दुस-या यशस्वी ई-निविदाधारकास रेती घाट मंजूर केल्यास अथवा फेर ई-निविदेद्वारे विल्हेवाट केल्यास तसेच शासनास झालेले नुकसान जमीन महसूल थकबाकी म्हणून वसुल केल्यास माझी काहीएक हरकत राहणार नाही याची मला जाणीव आहे.

मी असेही घोषित करतो की, महसूल यंत्रणेने ताबा देण्याच्या तारखेस व वेळेस मी हजर राहून ताबा घेईल. मुदतीत ताबा न घेतल्यास माझ्यावर होणा-या कारवाईस मी पात्र राहिल. तसेच निविदेतील मुदत संपण्यावर मी मुदतवाढी कोणत्याही कोर्टात दावा करणार नाही.

मी असेही घोषित करतो की, सदरहू रेती/वाळू घाट आणि अनुमोदित रस्त्याची मी पाहणी केली आहे. वाळूचा दर्जा, साठा व त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती/वाळू वाहतुकीसाठी योग्यतेबाबत मी इतर कोणताही आक्षेप उपस्थित करून वाद निर्माण होणार नाही.

**ठिकाण**-----------------

**दिनांक** -----------------  **अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी**

**साक्षीदार**

1 पूर्ण नांव------------------------------------------------------- स्वाक्षरी ---------------------

पूर्ण पत्ता -------------------------------------------------------

2 पूर्ण नांव------------------------------------------------------- स्वाक्षरी -------------------

पूर्ण पत्ता -------------------------------------------------------